-

## नियमीत दिवाणी दावा क्रं. ३२/२०१२ मधील नि. १५१ खाली आदेश

प्रस्तुत दावा वादीने वाटप, ठराव व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे.

०२. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ६ विठ्ठल सदाशिव गोळे हे दि.०१–०७–२०२३ रोजी मयत झाले आहेत. सदरील प्रतिवादी मयत झाल्यानंतर त्यांना काही कारणामुळे व कायदयाची जाण नसलेमुळे मयताचे वारस दाव्याचे कामी कळवावे लागतात याची माहिती वादींना नव्हती. तसेच वादी हे कामानिमितत बाहेरगावी असल्यामुळे मयत प्रतिवादीचे मृत्युची व तिचे वारसांबाबतची माहिती वकिलांना वादीकडून वेळेत मिळालेली नाही. त्यामुळे सदर मयत प्रतिवादीचे वारस दाव्याचे कामी वेळेत दाखल करता आले नाही. सदरचा झालेला विलंब हा वादीचे वारसांकडून हेतुपुरस्सर झालेला नाही. सदरचा झलेला विलंब हा माफ होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. सदरचा दावा वादी यांनी ठरावासाठी दाखल केलेला असलेने तो चालून त्याचा गुणदोषावर निकाल होउन वादी व प्रतिवादींमधील अंतिम वाद संपुष्टात येणे मदतच होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र ६ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०३. सदर प्रमाणे वादी वारसांना दाव्याचे कामी दाखल करुन घेतलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदर वादी वारसाना दाव्याचे कामी दाखल करुन न घेतल्यास वादी वारसांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सदरील वादी वारसांना सदर दाव्याचे काम पुढे चालविणे आवश्यक व गरजेचे आहे. त्यामुळे सदरचा वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता झालेला उशिर माफ करावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०४. सदर अर्जावर मागील बाजुस प्रतिवादीने म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीने असे नमुद केले आहे की, वादी यांनी सदरचे अर्जामध्ये किती दिवसाचा विलंब झालेला आहे याचे बाबत कोणतेही कथन केलेले नाही. सदरकामी वादी यांनी

सदर अर्जामध्ये कोणतेही कारण नमुद न केल्याने सदरचा अर्ज हा नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०५.** वादींचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ६ यांचे वारस असल्यास त्यांचा खटला दाखल करण्याचा अथवा विरोधी पक्ष राहण्याचा अधिकार हा जिवंत राहिला असल्याने त्या संदर्भात त्यांना रेकॉर्डवर घेण्याकरीता परवानगी न दिल्यास गुंतागुंत वाढू शकेल आणि अर्जाचा गुणदोषावर निर्णय देणेस अडचण निर्माण होईल. सदर कामी प्रतिवादी क्र. ६ हे दि. ०१/०७/२०२३ रोजी मयत झाले आहेत असे वादीने नमुद केले आहे.

**०६.** प्रस्तुतच्या अर्जात नमुद केलेली कारणमिमांसा व दाव्यात निघुन गेलेला वेळ हे जुळून येत नसले तरी वादीचे वारस रेकॉर्डवर घेतल्यास दाव्याचे कामकाज गुणदोषावर चालविणे अधिकच सोयीचे होईल. वाया गेलेले वेळेबाबत भरपाई म्हणून वादी यांना कॉस्ट देणे न्यायोचित ठरेल. सबब, दाव्याचा अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. ६ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफीचा अर्ज कॉस्टसह मंजूर करीत आहे. वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१ प्रस्तुतचा अर्ज वादीवर रक्कम रुपये ३००/- कॉस्ट बसवून मंजुर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र. ६ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात आला.

३. कॉस्टची रक्कम भोर बार असोसिएशन ला देण्यात यावी.

Sd/-

दि.०४.०१.२०२४.
भोर .

(एन.के.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भोर

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | – | Smt. S.A.Sonawane |
| Court Name | – | Hon'ble Smt. N.K.Nagargoje |
| Date of Order/Judgment | – | 04/01/2024 |
| Date of Sign Order/Judgment | – | 04/01/2024 |
| Order uploaded on | – | 08/01/2024 |